**<u>सेशन केस नं. २३/१६</u>**
**<u>सा.क्र. १ निशाण क्र.११</u>**

**सरकार तर्फे साक्षीदार क्र. १ ची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,
माझे नांव :— संतोष वडिलांचे नांव :— रामचंद्र कांदळकर
वय सुमारे :— ४९ वर्षे व्यवसाय :— आंबा व्यवसायीक
रहाणार:—मालवण, तालुका :—मालवण, जिल्हा:—सिंधुदुर्ग.

........................

**<u>अभियोग पक्षातर्फे सरकारी अभियोक्ता श्री.एस.के. तायशेटये सरतपासणी</u>**

दि.३०/११/२०१४ रोजी मला पोलिसांनी मालवण पोलीस स्टेशनमध्ये पंच म्हणून काम करणेसाठी बोलाविले होते. त्याप्रमाणे मी तेथे गेलो. दुसरा पंच रूपेश सातार्डेकर हजर होता. फिर्यादी राजेश कामतेकर हा देखील हजर होता. पोलिसांनी मला सांगितले की, भरड नाक्यावर पंचनामा करावयाचा आहे. त्यानंतर आम्ही सर्व भरड नाक्यावर आलो.

२. फिर्यादी राजेश कामतेकर यांनी भरड नाक्यावरील घटनास्थळ दाखविले. परब इलेक्ट्रॉनिक्सच्या समोरील रस्त्यावरील ती जागा होती. पोलीसांनी मोजमापे घेतली आणि पंचनामा केला. पोलिसांनी आम्हां पंचांच्या सहया घेतल्या. पोलिसांनी फोटोग्राफस् सुध्दा काढले. आता मला सदरचा घटनास्थळ पंचनामा दाखविला, तो तोच आहे, त्यावर अनुक्रमांक १ ला माझी सही आहे, त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे, त्यास **<u>नि.क्र.१२</u>** देण्यात येते.

**उलटतपास आरोपी क्र. १ व २ तर्फे वकील श्री. व्हि. पी.चिंदरकर यांचा**

३. हे म्हणणे खरे आहे की, पंचनाम्यामध्ये परब ईलेक्ट्रॉनिक्सचा उल्लेख नाही. हे म्हणणे खरे आहे की, पंचनाम्यामध्ये फोटो काढल्याचा उल्लेख नाही. हे म्हणणे खरे आहे की, पोलिसांनी मला पंचनाम्यासाठी बोलावले होते हे दाखविणेसाठी पंचनाम्याव्यतिरिक्त कोणताही कागदोपत्री पुरावा नाही. हे म्हणणे खरे आहे की, मालवण—कसाल रस्ता हा पुर्व—पश्चिम आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर रस्त्याचे दोन्ही बाजूला दुकाने आहेत. भरड हा भाग ३०० ते ४०० मीटर लांबीचा आहे. हे म्हणणे खरे आहे की, पुर्व दिशेला जाणारा रस्ता हा कसालकडे जातो. हे म्हणणे खरे आहे की, बाजारपेठ मालवण ते एस.टी.स्टॅन्ड मालवण यांचेमध्ये भरडनाका आहे. हे म्हणणे खरे आहे की, बाजरपेठ मालवणमधून सदरचा रस्ता कोर्टाकडे जातो. हे म्हणणे खरे आहे की, भरड नाक्यावरून एक रस्ता रेवतळेकडे जातो आणि एक रस्ता पिंपळभाटकडे जातो. पिंपळभाटकडे जाणा—या रस्त्यावर टॉकीज आहे. भरडनाका असे शब्द नकाशामध्ये लिहिलेले नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, नकाशामध्ये मोजमापे आणि दिशा दर्शविलेल्या नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, सदर पंचनाम्यातील शेवटचे पान वगळता प्रत्येक पानावर आमची सही नाही.

४. निक्सन फर्नांडीस ही व्यक्ती मला माहीत नाही. हे म्हणणे खरे आहे की, नकाशात दाखविलेला सायबर कॅफे हा निक्सन फर्नांडीस यांचे मालकीचा होता. हे म्हणणे खरे नाही की, राजेश कामतेकर याने नकाशात लिहिलेला सदर सायबर कॅफे समोरील जागा ही

घटनास्थळ अशी दाखविली हे मी खोटे सांगतो. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळ दाखविलेल्या रस्त्याच्या दोन्ही बाजूला प्रत्येकी सात ते आठ दुकाने आहेत. हे म्हणणे खरे आहे की, सायबर कॅफेच्या दोन्ही बाजूला दुकाने आहेत. हे म्हणणे खरे आहे की, पिंपळभाटकडे जाणारा रस्ता आणि बाजारपेठकडे जाणा—या रस्त्याचे मधील कॉर्नरवर पोलीस उभा असतो. त्या जागेवरून सायबर कॅफे दिसू शकतो.

५. हे म्हणणे खरे आहे की, दि.३०/११/२०१४ रोजी बाजारपेठ मालवण ते एस.टी.स्टॅन्ड रस्त्याचे दोन्ही बाजूला गटाराचे काम काही महिने चालू होते. साक्षीदार पुन्हा सांगतो की, गटाराच्या खोदकामाचे काम रस्त्याचेमधून चालू होते. हे म्हणणे खरे आहे की, खोदकाम केलेल्या गटाराचे दोन्ही बाजूला खोदलेली माती होती. मी मालवणमध्ये जन्मपासून राहतो.

६. हे म्हणणे खरे आहे की, राजेश कामतेकर हा माझा भाचा आहे. हे म्हणणे खरे आहे की, घटनेच्या वेळी माझी पत्नी मालवण नगरपरिषदेची नगरसेविका होती. हे म्हणणे खरे नाही की, हे मी खोटे सांगतो की, दि.३०/११/२०१४ रोजी मी भरडनाक्यावर गेलो आणि पोलिसांनी माझे समक्ष पंचनामा केला. हे म्हणणे खरे नाही की, परब ईलेक्ट्रॉनिक्स नावाचे दुकान भरडनाक्यावर नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास आरोपी क्र.३ तर्फे वकील श्री.ए.एस. डिंगणकर यांचा**

आरोपी क्र.१ व २ यांनी घेतलेला उलटतपास स्विकारला.

फेरतपास नाही.

साक्षीदार यास जबानी समक्ष वाचून दाखविली,
बरोबर असल्याचे मान्य व कबुल केले.

सही/—
दिनांक—०७/०१/२०२०
(पी.आर.कदम)
अतिरिक्त सत्र न्यायाधीश,
सिंधुदुर्ग—ओरोस.